दीर्घ प्रतीक्षेनंतर शहरात दिवसभर संततधार पाऊस

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे/पिंपरी : दीर्घ प्रतीक्षेनंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात दिवसभर संततधार पाऊस बरसला. करोनाच्या पार्श्वभूमीवर आणि दिवसभर पडणाऱ्या पावसामुळे रस्त्यांवर दिवसभर रस्त्यांवर तुरळक गर्दी होती. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटण्याच्या घटना घडल्या. सायंकाळी कार्यालये सुटल्यानंतर अनेकांना गैरसोयीचा सामना करतच घर गाठावे लागले.

जूनच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसानंतर अपवाद वगळता विश्रांती घेतलेल्या पावसाचे सोमवारी रात्रीपासून पुनरागमन झाले. सकाळी पावसाच्या हलक्या सरी कोसळत होत्या.

मात्र, दुपानंतर पावसाचा जोर वाढला. परिणामी रस्त्यावरील वाहनांच्या संख्येतही लक्षणीय घट झाली होती. मार्केटयार्ड, तुळशीबाग, बोहरी आळी, सराफ बाजार, महात्मा फुले मंडईतील उलाढालीवर पावसामुळे परिणाम झाला. मंगळवारी दिवसभरात शहरात २७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. बुधवारपासून येत्या सोमवारपर्यंत (१० ऑगस्टपर्यंत) दररोज पावसाचा अंदाज पुणे वेध शाळेने वर्तवला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात सोमवारी रात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. मंगळवारी दिवसभर पावसाचा जोर कायम होता. सायंकाळी सातच्या सुमारास पावसाचा जोर कमी झाला. जून आणि जुलै महिन्यात पावसाने हुलकावणी दिल्यामुळे शहरवासीयांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. परंतु कालपासून सुरू झालेल्या पावसामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गेल्या वर्षी पवना धरण ४ ऑगस्ट रोजी १०० टक्के भरले होते. मात्र, यंदा या धरणात अवघा ३६.६५ टक्के एवढा पाणीसाठा आहे. पवना धरण भरण्यासाठी आणखी मोठ्या पावसाची आवश्यकता आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसभर संततधार पावसामुळे रस्त्यावर पाणी साचून वाहनधारकांची अशी तारांबळ उडाली.

बुधवारी जोरदार पावसाचा अंदाज

पुणे शहर आणि परिसरात बुधवारी (५ ऑगस्ट) पावसाच्या जोरदार सरी कोसळतील, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. घाट माथ्यावर पावसाच्या सरींचा जोर वाढणार असल्याने शहर आणि परिसरात नारंगी रंगाचा (ऑरेंज अलर्ट) इशारा दिला आहे. शहर आणि परिसरातील काही भागात पुढील २४ तासांत पावसाच्या मध्यम सरी (१५ ते ६४ मिलिमीटर) पडतील. तसेच तुरळक ठिकाणी पावसाचा जोर वाढेल. शहर परिसरातील घाट भागात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. परिणामी नदीकाठच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. झाडांच्या फांद्या पडण्याचा धोका असल्याचेही विभागाने नमूद केले आहे.

कोकण, मध्य महाराष्ट्राला पावसाने झोडपले

लोकसत्ता प्रतिनिधी

पावसाचा जोर दोन दिवस कायम राहणार

पुणे : दीर्घ विश्रांती घेतलेल्या पावसाने मुंबई, ठाण्यासह कोकणची किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूरला झोडपून काढले. सोमवारी रात्री सुरू झालेला पाऊस अनेक भागांत मंगळवारी रात्रीपर्यंत कायम होता. गेल्या चोवीस तासांत मुंबईत सर्वाधिक २७० मिलिमिटर पावसाची नोंद झाली. जोरदार पावसाने अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला. मात्र, धरणांतील पाणीसाठ्यात काही प्रमाणात वाढ झाल्याने आणि शेतीसाठी उपयुक्त पावसामुळे समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार कोकण, मध्य महाराष्ट्रात आणखी दोन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे. त्याचप्रमाणे या कालावधीत मराठवाडा आणि विदर्भातही अनेक ठिकाणी पावसाची हजेरी राहणार आहे. कोकणात काही ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात प्रामुख्याने घाट विभागांमध्ये अतिवृष्टीचा इशाराही देण्यात आला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मुसळधार पावसामुळे मंगळवारी जनजीवन विस्कळीत झाले. सावंतवाडी शहरातील संत गाडगेबाबा भाजी मंडईच्या परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे दणादाण उडाली. तेथील छपराचा पत्रा अंगावर पडल्याने महिला विक्रेती जखमी झाली, तर मोती तलावाच्या काठी असलेले भलेमोठे झाड उभ्या असलेल्या कारवर कोसळल्यामुळे अपघात झाला.

रत्नागिरीत पूरस्थिती

वेगवान वाऱ्यांसह पडणाऱ्या मुसळधार पावसाने मंगळवारी दिवसभर कोकणाला झोडपून काढले. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून झाडे पडण्याचे किंवा दरड कोळण्याचेही प्रकार काही ठिकाणी घडले आहेत . रत्नागिरी जिल्ह्यात मंगळवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत एकूण सरासरी ९२.७१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात सर्वाधिक पाऊस (१४२ मिलीमीटर) पडला, तर राजापुरात झाड अंगावर पडून एका महिलेचा मृत्यू ओढवला. मंडणगड तालुक्यातील भारजा नदीसह जिल्ह्यातील जगबुडी, वाशिष्ठी, गडनदी, शास्त्री, बावनदी, काजळी, अर्जुना या सर्व मोठ्या नद्यांना आलेल्या पुरामुळे आजुबाजूचा परिसर जलमय झाला आहे. अनेक ठिकाणी दोन्ही तीरावरील भातशेती पाण्याखाली गेली आहे. वादळी वाऱ्यामुळे झाडे पडून घर-गोठ्यांचे नुकसान झाले. जिल्ह्यात ठिकठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता.

महाबळेश्वरसह साताऱ्यात मुसळधार

महाबळेश्वर, पाचगणीसह सातारा जिल्ह्यात दमदार पुनरागमन झाले आहे. कोयनेसह सर्व धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने हजेरी लावली आहे. महाबळेश्वर, पाचगणी, वाई, मांढरदेव, खंडाळा, शिरवळ, भुईंज व पुणे बेंगलोर महामार्गासह सातारा शहरात पावसाने सोमवारी सायंकाळपासून जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे बाजारपेठ मात्र ठप्प झाली आहे. सातारा जिल्ह्यात सर्वत्र पावसाची संततधार सुरू आहे. सातारा शहर व परिसराला पावसाने झोडपले आहे. सकाळपासून पडणाऱ्या पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातील सखल भागात पाणी साचले आहे. महाबळेश्वर येथे १८७ मिलिमीटर पावसाची नोंद झालेली आहे. पाचगणी, वाई येथेही दमदार पावसाने हजेरी लावली आहे. जिल्ह्यात सर्वत्र पाऊस सुरू झाल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे. या पावसाने पिकांना जीवदान मिळाले आहे.

'सावित्री'ने धोक्याची पातळी ओलांडली

अलिबाग : रायगड जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. अतिवृष्टीमुळे सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे महाड शहरातील सखल भागात पुराचे पाणी शिरले. तर कुंडलिका आणि आंबा नद्याही दुपारनंतर इशारा पातळीवरून वाहत होत्या.

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये ३१ ऑगस्टपर्यंत बंदच

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ग्रंथ देवघेवीतून करोना संसर्ग होण्याची शक्यता असल्याचे कारण देत राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालये ३१ ऑगस्टपर्यंत बंदच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे १२ हजार सार्वजनिक ग्रंथालयांची सेवा बंद राहणार आहे.

करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय ग्रंथालये, शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालय संघ, संशोधन संस्थांनी चालविलेली शासनमान्य ग्रंथालये अशा सर्वांनी ग्रंथालय सेवा, अभ्यासिका, वाचन कक्ष या सेवा ३१ ऑगस्टपर्यंत बंद ठेवाव्यात, असे परिपत्रक ग्रंथालय संचालनालयाचे प्रभारी ग्रंथालय संचालक सुभाष राठोड यांनी काढले आहे. त्याचप्रमाणे अधिवेशन, कार्यशाळा, चर्चासत्र, ग्रंथोत्सव यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करू नये, असेही या आदेशामध्ये नमूद केले आहे.

ग्रंथालयामध्ये ग्रंथ देवघेव कक्षामध्ये आणि वाचन कक्षामध्ये येणाऱ्या वाचकांमुळे ग्रंथालयामध्ये गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे करोना विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रंथालयामध्ये येणारे वाचक आणि ग्रंथालय सेवक यांना करोना विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता विचारात घेऊन ग्रंथालय सेवा आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास ३१ ऑगस्टपर्यंत प्रतिबंध करण्यात आला असल्याचे राठोड यांनी या आदेशामध्ये नमूद केले आहे.

विभागनिहाय ग्रंथालये

पुणे - ४ हजार २६९
अमरावती - २ हजार ४१
औरंगाबाद - ४ हजार २६९
नागपूर - १ हजार १०८
नाशिक - १ हजार ६७०
मुंबई - ६२२

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय विश्रामगृहासमोर, जेल रोड, कॅम्प, अमरावती – ४४४६०२
दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६१० e-mail: dgmamravati@mahaurja.com/doyavatmal@mahaurja.com

ई–निविदा सूचना

यवतमाळ जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ५२ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींमध्ये प्रस्तावीत असलेल्या एकूण ३७८ कि.वॅट पैकी २२१ कि.वॅट पारेषण संलग्न सौर विद्युत संच नक्त मापन प्रणालीसह व १५७ कि.वॅट पारेषणविरहीत सौर विद्युत संच अशा एकत्रित सर्व प्रकल्पांच्या आस्थापनेसाठी सर्वेक्षण, पुरवठा, आस्थापना, चाचणी तसेच दुरस्थ निगराणी प्रणाली व यशस्वीरित्या कार्यान्वित करुन ५ वर्षाच्या हमी कालावधीत सुट्या भागांसह सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती करणे (CMC) या कामासाठी केंद्र शासनाच्या (न.व.न.ऊ.मंत्रालय) / शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणित असलेल्या सौर विद्युत संच / साधनांचे उत्पादक व त्यांचे नोंदणीकृत वितरक यांच्याकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहे.

ई–निविदेच्या सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचेकडे राखीव राहतील.

विभागीय महाव्यवस्थापक

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय विश्रामगृहासमोर, जेल रोड, कॅम्प, अमरावती – ४४४६०२
दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६१० e-mail: domedaamravati@mahaurja.com/dgmamravati@mahaurja.com

ई–निविदा सूचना

प्रकल्प अधिकारी (ए.आ.वि.प्र.), धारणी या कार्यालयांतर्गत मौजे – सुमीता व रेट्याखेडा, ता.चिखलदरा, जि.अमरावती येथे अनुक्रमे ३७.८ कि.वॅट व २९.४ कि.वॅट क्षमतेचे पथदर्शी विकेंद्रित सुक्ष्म पारेषण प्रकल्प (Solar Micro-Grid Project) आस्थापनेसाठी सर्वेक्षण, पुरवठा, आस्थापना, चाचणी व यशस्वीरित्या कार्यान्वित करुन ५ वर्षाच्या हमी कालावधीत सुट्या भागांसह सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्ती करणे (CMC) या कामासाठी केंद्र शासनाच्या (न.व.न.ऊ.मंत्रालय) / शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणित असलेल्या सौर विद्युत संच / साधनांचे उत्पादक व त्यांचे नोंदणीकृत वितरक यांच्याकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहे.

ई–निविदेच्या सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचेकडे राखीव राहतील.

विभागीय महाव्यवस्थापक

पुणे छावनी परिषद, भारत सरकार, रक्षा मंत्रालय, गोलीबार मैदान, पुणे 411001.
Pune Cantonment Board, Govt. of India, Ministry of Defence, Golibar Maidan, Pune 411001.
दूरभाष संख्या : 020-26452159 ई-मेल आई डी : ceopunecantt@gmail.com
पत्र संख्या : OS/2020. दिनांक : 04th August 2020.

WALK IN INTERVIEW

Walk in interview for the posts of Doctors, nurses, intensivist, Ayah and Nursing Orderly at Sardar Vallabhbhai Patel Cantonment General Hospital (ICU UNIT), on purely temporary basis for a period of 89 days renewable. The interview will be held in the Office of the Pune Cantonment Board, Golibar Maidan, Pune 411 001 on 10.08.2020 at 11.00 a.m.

Sr. No.	Name of the Post	Minimum Qualification	Experience	Age	Pay
1	Intensivist - 06 Nos.	MD Anesthesia and MD Medicine	1 year	Below 55 yrs	Rs.1,00,000/-
2	Doctors - 04 Nos.	MBBS (preference for candidates with ICU experience)	1 year	Below 55 yrs	Rs.70,000/-
3	Doctors - 10 Nos.	BHMS/BAMS/BUMS	1 year	Below 55 yrs	Rs.40,000/-
4	Nurses - 16 Nos.	GNM, BSc Nursing with ICU experience	1 year	Below 55 yrs	Rs.30,000/-
5	Ayah - 08 Nos. Nursing Orderly - 08 Nos.	10th Standard	1 year	Below 55 yrs	Rs.16,000/-

Interested candidates are requested to attend the walk in interview on the aforesaid date and time with application and full bio-data along with original certificates in the Office of the Cantonment Board, Golibar Maidan, Pune- 411 001.

CHIEF EXECUTIVE OFFICER
PUNE CANTONMENT BOARD
(AMIT KUMAR)
Date: 04.08.2020

सेंच्युरी एन्का लिमिटेड
सीआयएन : एल२४३०४पीएन१९६५पीएलसी१३९०७५
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं. ७२ आणि ७२-ए, एमआयडीसी, भोसरी, पुणे-४११०२६
दूरध्वनी क्रमांक : ०२०-६६१२७३००. फॅक्स नंबर : ०२०-२७१२०११३
वेबसाईट : www.centuryenka.com ई-मेल : cel.registeredoffice@birlacentury.com

३० जून २०२० रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

अ. क्र.	तपशील	रोजी संपलेले तीन महिने			रोजी संपलेले वर्ष
		३० जून २०	३१ मार्च २०	३० जून १९	३१ मार्च २०
		अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
१.	व्यवहारातील एकूण उत्पन्न	१०,९९५	३५,९८४	३८,०३८	१,४६,५७१
२.	कालावधीतील निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ अथवा असाधारण बाबींपूर्व)	(३,४०३)	२,८२९	२,९०१	८,६४५
३.	करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतरचा)	(३,४०३)	२,८२९	२,९०१	८,६४५
४.	करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/ अथवा असाधारण बाबींनंतरचा)	(२,४९०)	२,१८८	१,८४८	९,५५३
५.	कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न (कालावधीतील (करोत्तर) नफा/(तोटा) आणि अन्य समावेशक उत्पन्न (करोत्तर) अंतर्भूत)	(१,६९१)	१,५६६	१,७४२	८,८३१
६.	भरणा केलेले समभाग भांडवल (प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याचे)	२,१८५	२,१८५	२,१८५	२,१८५
७.	(प्रत्येकी रु. १०/- च्या) प्रति भाग मिळकत - पायाभूत - सौम्यीकृत	(११.४०) (११.४०)	१०.०१ १०.०१	८.४६ ८.४६	४३.७२ ४३.७२

नोंदी :
१. लेखापरिक्षण समितीने वरील निष्कर्षांचे परीक्षण केले आहे व मंजुरीसाठी संचालक मंडळाकडे त्यांची शिफारस केली आहे आणि ४ ऑगस्ट २०२० रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत संचालक मंडळाने ते मंजूर केले आहेत.
२. वरील उतारा, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत दी स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर केलेल्या तिमाही निष्कर्षांच्या सविस्तर रुपाचा सारांश आहे. तिमाही निष्कर्षांचे संपूर्ण रूप, दी स्टॉक एक्स्चेंज वेबसाईटवर (www.nseindia.com आणि www.bseindia.com मध्ये) व कंपनीच्या वेबसाईटवर (www.centuryenka.com मध्ये) उपलब्ध आहे.

संचालक मंडळासाठी व त्यांच्या वतीने
ओ. आर. चितलंगे
(व्यवस्थापन संचालक)
स्थळ : मुंबई
दिनांक : ०४ ऑगस्ट २०२०

बँक ऑफ इंडिया
पुणे विभागीय कार्यालय : ११६२/६, शिवाजीनगर, विद्यापीठ रोड, पुणे-०५, फोन : ०२०-२५५३५४२१ /२५५३५४३३
ईमेल : zo.pune@bankofindia.co.in

जागा पाहिजे

आमच्या **ॲमनोरा पार्क टाऊन शाखेकरिता** तळमजल्यावर (ग्राऊंड फ्लोअर) १२५० स्क्वेअर फूट जागेची आवश्यकता आहे. याबाबतची सविस्तर माहिती आमची वेबसाईट **www.bankofindia.co.in** वर उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज पुणे विभागीय कार्यालय, ११६२/६, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००५. येथून कॉर्पोरेट सर्व्हिसेस, डिपार्टमेंट, (CSD) किंवा हडपसर शाखा येथून **दि. ०५/०८/२०२० ते दि. १७/०८/२०२०** या तारखेपर्यंत **१७.००** वाजेपर्यंत प्राप्त करता येतील.. तांत्रिक अर्जाची पडताळणी विभागीय कार्यालय येथे **दि. १८/०८/२०२० रोजी १७.००** वा. होईल

दिनांक : ०५/०८/२०२०, स्थळ : पुणे सही/- विभागीय व्यवस्थापक, पुणे विभाग

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५

महापौर कार्यालय

स. न. वि. वि.,

यंदाच्या वर्षी श्री गणेशोत्सव दिनांक २२ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२० या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. प्रतिवर्षी गणेशोत्सवात पुणे शहरातील सर्वधर्मीय नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असतो. परंतु यावर्षी कोविड-१९ या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर सदरचा गणेशोत्सव शांततेने व शिस्तीने पार पाडण्याच्या दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व मनपाचे मा. सभासद व पोलीस अधिकारी यांची एक संयुक्त बैठक गुरुवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२० रोजी, सकाळी १०.३० (दहा वाजून तीस मिनिटे) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पुणे महानगरपालिका भवन (जुनी इमारत), शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे आयोजित करण्यात आली आहे.

तरी सदर प्रसंगी आपण अवश्य उपस्थित राहावे, ही विनंती.

मा. स. कळावे,

मुरलीधर मोहोळ
महापौर, पुणे

टीप :- सद्यस्थितीस कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेता जास्तीत जास्त सदस्यांनी खालील लिंकद्वारे बैठकीत सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

लिंक – http://meet.google.com/cta-xrpb.tcj

प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या श्री गणेश मंडळांच्या सदस्यांना विनंती आहे की, केवळ एकाच सदस्याने बैठकीस उपस्थित राहावे. सदर बैठकीस मास्कचा वापर बंधनकारक असेल.

पिंपरी चिंचवड नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शाहूनगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे
स्थावर मालमत्ता ताबा नोटीस
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम १९६१ मधील नियम १०७ पोटनियम (११(ड-१) उपनियमाअन्वये)

ज्याअर्थी खाली सही करणारे विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. डी. एस. शेवकरी द्वारे पिंपरी चिंचवड नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत शाहूनगर, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे महाराष्ट्र …

स्थळ : धामणी
दिनांक : ११.०३.२०२०

श्री. डी. एस. शेवकरी
विशेष वसुली अधिकारी

Edelweiss Asset Reconstruction
एडेलवाईज हाउसिंग फायनान्स लिमिटेड
ई-लिलाव विक्री सूचना
…
स्थळ : पुणे
दिनांक : 05.08.2020

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र- कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070708809-1

वृद्धश्रम/सेवासंस्था

पनवेल हिरानंदानीमध्ये सीनियर सिटीझनसाठी 'विसामो वृद्धाश्रम' (हाय फाय सुविधा) Pure Veg. अधिक माहितीसाठी संपर्क करा: 9867605555/ 9967375555.
0070710066-1

नावात बदल

My child name Mohd Ayan changed as Mohammad Ayan Khan as per Aff No P-38/2020 dated 04/08/2020
0090274283-2

Mehmood Miya Mohammad Fazil Saudagar (new name) Mehmood Fazil Saudagar (Old name). Aadhaar no. 754163512246.
0090274281-1

My name Pravin Mansingh Rajpurohit changed as Pravinsingh Rajpurohit as per aff P-39/2020 dated 04/08/2020.
0090274283-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्यांच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा